23-01-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 01/22/2025 11:00 PM Page 1



भूमिगत केबलिंगच्या कामांमुळे रस्ते धोकादायक !
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रताचा इंग्लंडवर दणदणीत विजय
पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २३ जानेवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 141 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 23 January, 2025 | Pages 4 | ₹ 4

# गोवावासीयांची रोज होतेय लाखोंची लूट !

## सायबर क्राइम सेलकडून ८५ वेब पोर्टल बंद

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २२ : सायबर गुन्हेगारांकडून गोव्यातल्या अनेक नागरिकांना दररोज लाखो रुपयांना लुटले जात असल्याची धक्कादायक माहिती पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी दिली आहे. भारतातील सायबर फसवणुकीची रक्कम २५,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे आणि एक लाख तक्रारी दाखल झाल्या आहेत, अशी माहिती गोवा पोलिसांनी दिली. समाजात सायबर सुरक्षा जागरूकता वाढवण्याची गरज पूर्ण करण्यासाठी पोलिस, प्रेस आणि मीडिया आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्रित प्रयत्न करण्याची विनंती पोलिस महासंचलकांनी केली आहे. गोवा पोलिसांनी गोवा पत्रकार संघाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या सायबर जागरूकता सत्रात ते बोलत होते**

भारतात सायबर गुन्हेगारी वेगाने फोफावत आहे. गेल्या काही वर्षांत सायबर फसवणुकीला बळी पडून निष्पाप भोळ्या लोकांनी आपल्या कष्टाचे २५,००० कोटी रुपये गमावले आहेत. गोव्यातच अनेक बळी दररोज लाखो रुपयांचे कष्टाचे पैसे गमावत आहेत. गोवा पोलिस या प्रकरणांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या सहा महिन्यांत या धोक्याला आळा घालण्यासाठी अनेक नवीन उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. मी प्रेस आणि मीडियालाही या प्रयत्नात मदत



करण्याचे आवाहन करतो, असे डीजीपी आलोक कुमार म्हणाले.

सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे आणि लोकांची फसवणूक कशी होते, फसवणूक कशी टाळायची आणि फसवणूक झाल्यास तक्रार कुठे दाखल करायची याची माहिती समाजातील सर्वात खालच्या स्तरापर्यंत पोहोचावी याची खात्री करण्याचे लक्ष्य आम्ही ठेवले आहे. गोवा पोलिस जनजागृतीसाठी त्यांच्या सोशल मीडिया हँडल्सचा वापर करत आहेत आणि गोव्यातील माध्यमांनीही जनजागृती करण्यासाठी असेच करावे अशी आमची अपेक्षा आहे. जर आपण एकत्र आलो तर गोव्यात सायबर सुरक्षा साध्य करता येईल, असे त्यांनी सांगितले.

सायबर सेलचे पोलिस निरीक्षक दीपक पेडणेकर यांनी त्यांच्या निरीक्षणांवर बोलताना सांगितले की सायबर गुन्हेगार लोकांच्या हलगर्जीपणाचा, लोभाचा आणि भीतीचा फायदा घेत आहेत आणि त्यांच्या कष्टाच्या पैशाची फसवणूक करत आहेत. बनावट गुंतवणूक मोबाइल ॲप्लिकेशन्स, डिजिटल अटक, सेक्सटॉर्शन, सोशल मीडिया हँडल्सवर बनावट प्रोफाइल तयार करणे, नोकरीच्या बनावट ऑफर देणे, कर्ज देण्यासाठी बनावट अर्ज आणि इतर अनेक पद्धती सायबर गुन्हेगार वापरत आहेत. लोकांनी सतर्क आणि सतर्क राहण्याची गरज आहे. त्यांनी त्यांची वैयक्तिक माहिती ऑनलाइन किंवा कोणत्याही अज्ञात व्यक्तींसोबत शेअर करू नये. प्राप्त झालेले आणि संशयास्पद दिसणारे संदेश देखील क्रॉस व्हेरिफिकेशन करणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.सायबर क्राइम सेलचे पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता यांनी माहिती दिली आहे की, गोवा पोलिसांनी आतापर्यंत लोकांची फसवणूक करणारे आणि सायबर गुन्हेगार चालवणारे ८५ वेब पोर्टल बंद केले आहेत.

## कर्नाटकात दोन अपघातात १८ जण ठार

**बेळगाव , दि. २२ :** कर्नाटकात बुधवारी दोन वेगवेगळ्या झालेल्या अपघातांत १८ जण ठार झाले तर पंचवीस अधिकजण जखमी झाले आहेत. पहिल्या घटनेत उत्तर कन्नड जिल्ह्यातील यल्लापूर तालुक्यात पहाटे ४ वाजण्याच्या भाजीपाल्याचा ट्रक पलटून झालेल्या अपघातात १४ जणांचा जागेवरच मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग ६३ वर हा भीषण अपघात झाला आहे. ट्रक ५0 मीटर खोल दरीत कोसळला आहे. तर, दुसऱ्या दुर्घटनेत ३ विद्यार्थ्यांसमवेत ४ जणांचा मृत्यू झाल्याचीही दुर्घटना घडली. कर्नाटकच्या रायपूर जिल्ह्यात ही घटना घडली. नरहरी मंदिरात पूजा करण्यासाठी विद्यार्थ्यांची कार हम्पीच्या तिर्थयात्रेसाठी निघालेली होती. मात्र, भीषण दुर्घटनेत कारमधील ४ जणांचा मृत्यू झाला.

कन्नड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६३ वरून भाजीपाल्यांनी भरलेल्या लॉरीतून २५ जण प्रवास करत होते. गुळ्ळापुरजवळील घट्टा परिसरात ही लॉरी पलटल्यानंतर लॉरीतून प्रवास करणाऱ्या १0 जणांचा जागीच मृत्यू झाला. तर, ट्रकमधील इतर १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिका व पोलिस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली असून जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर, मृत व्यक्तींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

दरम्यान पहाटेच्या सुमारास भाजीपाला घेऊन जाणाऱ्या ट्रकसोबत घट्टा परिसरात पहाटे धुक्याचे वातावरण असल्याने ही दुर्घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. धुक्याच्या वातावरणामुळे पुढील वाहनाचा अंदाज न आल्याने लॉरी पुढच्या वाहनाला धडकली आणि चालकाचा ट्रकवरील ताबा सुटला. त्यानंतर, बाजुच्या खड्ड्यात ट्रक पडली असल्याचे प्राथमिक माहितीनुसार सांगण्यात येत आहे. दरम्यान, अपघातातील जखमींना हुबळी किम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यल्लापूर पार्लिस स्थानकाच्या पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पुढील तपास सुरू केला आहे.

दुसरीकडे, कर्नाटकमधील रायचूरमध्येही भीषण अपघात झाला आहे. अपघातात तीन विद्यार्थ्यांसह चौघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये गाडी चालकाचा समावेश आहे. अपघातात १0 जण जखमी झाले आहेत. जखमींना हॉस्पिटमध्ये दाखल करण्यात आले आहे. मंत्रालय संस्कृत पाठशाळेचे हे विद्यार्थी होते. हम्पीतील तीर्थ यात्रेसाठी आले होते. नरहरी मंदिरात पूजा करून निघाले असता त्यांच्यावर काळाने घाला घातला.

## निवडक

### यूपीएससीकडून 'सीएसई'साठी अधिसूचना

**नवी दिल्ली, दि. २२ :** केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) ने आज नागरी सेवा परीक्षा (सीएसई) २०२५ साठी अधिसूचना जारी केली आहे. या वर्षी आयोगाने नागरी सेवा परीक्षेसाठी ९७९ जागांसाठी जाहिरात काढली आहे. गेल्या वर्षी आयोगाने १ हजार १0५ पदांसाठी जाहिरात जारी केली होती. ही संख्या गेल्या तीन वर्षआं

भरल्या जाणाऱ्या एकूण रिक्त जांगामध्ये ३८ पदे ही अपंग उमेदवारांसाठी राखीव आहेत, त्यापैकी तब्बल १२ जागा अंध आणि कमी दृष्टी असलेल्या उमेदवारांसाठी, ७ जागा कर्णबधिर उमेदवारांसाठी असतील. तर १0 जागा या सेरेब्रल पाल्सी, कुष्ठरोग बरा झालेले उमेदवार, ड्वॉर्फीज्म (वुरीषळीा), ॲसिड हल्ला पीडित आणि मस्क्यूलर डिस्ट्रॉफी यासारख्ये लोकोमोटर अपंगत्व असणाऱ्या उमेदवारांसाठी १0 रिक्त जागा राखीव असतील आणि नऊ रिक्त पदे ही एकापेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या उमेदवारांकडून भरण्यात येतील.

### मणिपूरमध्ये दोन दहशतवाद्यांना अटक

**इम्फाळ, दि. २२ :** मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात वेगवेगळ्या कारवाईत दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी सांगितले की, मंगळवारी टोप खोंगनांगखोंग येथून बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) च्या एका सक्रिय सदस्याला अटक करण्यात आली. येंगखोम भोगेन सिंग (वय ५0) असे त्याचे नाव आहे. तसेच बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी (एमएफएल) च्या एका सदस्याला मंत्रीपुखरी बाजार येथून अटक करण्यात आली. पुखरामबम थोइबा सिंग (वय ३८) असे त्याचे नाव आहे.

### 'शेख हसिना यांना स्वाधीन करा'

**ढाका, दि. २२ :** गतवर्षी ऑगस्ट महिन्यात झालेल्या बंडानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना यांना आपल्या पदाचा राजीनामा देऊन भारतात आश्रयाला यावे लागले होते. तेव्हापासून शेख हसीना यांचे आपल्याकडे प्रत्यार्पण करावे, अशी मागणी बांगलादेशमधील अंतरिम सरकारकडून केली जात आहे. दरम्यान, मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासाठी भारताला धमकी देणारे विधान केले आहे.

बांगलादेशातील अंतरिम सरकारमध्ये कायदेमंत्री असलेले आसिफ नजरूल यांनी सांगितले की, जर भारताने शेख हसीना यांना माघारी पाठवले नाही तर ही बाब भारत आणि बांगलादेश यांच्यातील प्रत्यार्पण कराराचे सरळ सरळ उल्लंघन असेल. ढाका येथे एका पत्रकार परिषदेदरम्यान, कायदेमंत्री आसिफ नजरूल यांनी सांगितले की, बांगलादेश सरकारने या संबंधांमध्ये भारत सरकारला एक पत्रही लिहिले आहे. त्यात केलेल्या उल्लेखानुसार भारताला कोणत्याही परिस्थितीत शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करावं लागेल, जर असे झाले नाही तर बांगलादेशच्या परराष्ट्रमंत्रालयाकडून हा विषय आंतरराष्ट्रीय मंचावर उपस्थित केला जाईल, असा इशाराही बांगलादेशने दिला आहे.

## कदंबच्या शेकडो कर्मचाऱ्यांची मुख्य कार्यालयावर धडक



टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** कदंबा ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन आणि अलाइड एम्प्लॉईज असोसिएशनने बुधवारी ४०० हून अधिक कर्मचाऱ्यांना घेऊन कदंबा ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लिमिटेड (केटीसीएल) च्या पर्वरी येथील मुख्य कार्यालयात जाऊन अध्यक्ष उल्हास तुयेकर यांना त्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

निवेदनात, असोसिएशनने १ जानेवारी २०१६ ते २१ ऑक्टोबर २०१८ पर्यंतची ३४ महिन्यांची किमान थकबाकी तात्काळ देण्याची मागणी केली, जी २० ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी देण्याचे मान्य केले होते.

डिसेंबर २००९ पासून लागू होणारा १२ टक्के दराने भविष्य निर्वाह निधी पुनर्संचयित करणे, ३०० नवीन डिझेल बस खरेदी करणे, तीन वर्षे सेवा पूर्ण केलेल्या सर्व चालक आणि वाहकांना नियमित करणे, तिकीट तपासनीस म्हणून बढती देणे, आंतरराज्यीय मार्गांचे आउटसोर्सिंग आणि म्हजी बस योजना बंद करणे या आणि अशा अन्य मागण्या कामगारांनी संघटनेमार्फत केल्या. निवेदनाद्वारे, केटीसी ड्रायव्हर्स आणि अलाइड एम्प्लॉईज असोसिएशनच्या सदस्यांनी म्हटले आहे की जर त्यांच्या समस्या सोडवल्या गेल्या नाहीत तर त्यांना अनिश्चित काळासाठी आंदोलन करण्यास भाग पाडले जाईल. यापूर्वी, केटीसीएल व्यवस्थापन आणि केटीसी ड्रायव्हर्स अँड अलाइड एम्प्लॉईज असोसिएशन युनियन यांच्यात झालेल्या करारानंतरही, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या समस्यांकडे केटीसीएल व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी विविध केटीसीएल डेपो आणि बस स्टँडमधील प्रतिनिधी एकत्र आले होते. मात्र त्यावेळी देखील या मागण्या लवकरात लवकर मार्गी लावण्यात येतील असे आश्वासन या कर्मचाऱ्यांना दिले गेले होते.

## जळगाव रेल्वे ट्रॅकवर मृत्यूचे तांडव

### मृताचा आकडा १२ | आगीच्या भीतीने घेतल्या उड्या, समोरून येणाऱ्या एक्स्प्रेसने चिरडले

**जळगाव, दि. २२ :** बंगळुरू एक्सप्रेसच्या धडकेत जळगावजवळील परधाडे रेल्वे स्थानकाजवळ १२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीषण दुर्घटना घडली. न घडलेल्या घटनेच्या अफवेने क्षणात घात केला अन् १२ कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला. जळगावहून मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्सप्रेसला आग लागल्याच्या भीतीने काही प्रवाशांनी चालत्या गाडीतून उड्या मारल्या. मात्र, त्याचवेळी समोरुन येणाऱ्या बंगळुरु एक्सप्रेसच्या खाली चिरडल्याची या प्रवाशांचा दुर्दैवी अंत झाला. जळगावमधील परधाडे स्टेशनजवळ हा भीषण अपघात दुपारी ३ ते ४ च्या दरम्यान घडला. या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ होत असून केवळ एका अफवेने घात केला आणि क्षणात १२ कुटुंबियांना मोठे दु:ख कोसळले.

जळगावहून मुंबईकडे एक्सप्रेस निघाली होती, पोचाराजवळी परधाडे स्थानकाजवळ ट्रेन आली असता ब्रेक दाबल्यानंतर घर्षण होऊन ठिणग्या उडतात, तशा ठिणग्या उडाल्या होत्या. मात्र, तेव्हा ट्रेनमधील एका प्रवाशाने आग लागली, आग लागली असे बोलल्यामुळे रेल्वेतील काही प्रवाशांनी चैन ओढल्यानंतर रेल्वे थांबली. त्याचवेळी, ट्रेनमधून काही प्रवाशांनी उड्या मारल्या. दुर्दैवाने त्याचवेळी दुसऱ्या बाजुने कर्नाटकडे बंगळुरू एक्सप्रेस जात होती. या बंगळुरू एक्सप्रेसखाली चिरडून १२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. रेल्वेच्या एकाच डब्यातील लोकांनी या उड्या मारल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मात्र, कानावर पडलेल्या दोन शब्दांची कुठलीही खात्री न करता, संयम न बाळगता, घाईघाईने प्रवाशांनी रेल्वेतून उड्या मारल्या अन् नाहक जीव गमावला. दरम्यान, जळगावमधील आरपीएफ जवान, रेल्वे पोलिस आणि रेल्वेचे अधिकारी देखील घटनास्थळी घटनेचा पंचनामा केला आहे.



### रेल्वे अधिकाऱ्यांचे म्हणणे...

**मध्य रेल्वेचे पीआरओ डॉ. स्वानील लीला यांनी सांगितले की, पुष्पक एक्सप्रेस लखनऊहून मुंबईकडे येत होती. परंतु परधाडे स्थानकाजवळ अचानक ब्रेक लागल्याने ट्रेन थांबली. यावेळी काही प्रवासी रुळावर उतरले. तेवढ्यात विरुद्ध दिशेने जाणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने काही प्रवाशांना धडक दिली. मध्य रेल्वेचे सीपीआरओ डॉ. स्वानील यांनी सांगितले की, ट्रेनमध्ये 'एसीपी' म्हणजेच अलार्म चेन पुलिंग झाले होते. चेन पुलिंग का झाले याची माहिती अद्याप रेल्वेकडे नाही.**

### मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखाची मदत

**जळगाव जिल्ह्यातील पाचोरा नजीक अतिशय भीषण अशा प्रकारची दुर्घटना घडली आहे. काही लोकांना ट्रेनमधून धूर येतो आहे, असे वाटल्यामुळे किंवा त्याठिकाणी आग लागली असल्याचा समज झाल्यामुळे त्यांनी ट्रेनमधून उड्या घेतल्या आणि समोरून येणाऱ्या दुसऱ्या ट्रेनने त्यांना उडवले, असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसचे या अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखाची मदत जाहीर केली आहे.**

## ट्रम्प यांच्या निर्णयाने अमेरिकेतील भारतीयांना दिलासा

**वॉशिंग्टन, दि. २२ –** डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच एकामागून एक अनेक कार्यकारी आदेश जारी करायला सुरुवात केली आहे. या आदेशांपैकी एक म्हणजे अमेरिकेबाहेरील पालकांच्या मुलांचा जन्म जरी अमेरिकेत झाला तरी त्यांना जन्माच्या वेळी देण्यात येणारे अमेरिकन नागरिकत्व रद्द करणे.

ट्रम्प यांनी वेळोवेळी अमेरिकेत येणाऱ्या स्थलांतरितांबद्दल कठोर विचार व्यक्त केले आहेत. अशा परिस्थितीत, जन्मानुसार नागरिकत्वाची व्याख्या बदलल्याने तेथे राहणाऱ्या भारतीयांसह इतर देशांच्या लोकांवर परिणाम होऊ शकतो.हा नवीन नियम निर्णयानंतर ३० दिवसांनी म्हणजेच २० फेब्रुवारीपासून जन्मलेल्या प्रत्येक मुलाला लागू होईल.जर अमेरिकेत जन्मलेल्या मुलाची आई तिथे बेकायदेशीरपणे राहत असेल किंवा जर मुलाच्या जन्माच्या वेळी वडील अमेरिकेचे नागरिक किंवा कायदेशीर कायमचे रहिवासी नसतील किंवा मुलाच्या जन्माच्या वेळी आई अमेरिकेची कायदेशीर परंतु तात्पुरती रहिवासी असेल , आणि मुलाच्या जन्माच्या वेळी वडील अमेरिकेचे नागरिक किंवा कायदेशीर कायमचे रहिवासी नसतील तर अशा परिस्थितीत अमेरिकन नागरिकत्व दिले जाणार नाही.

तथापि, हा आदेश जारी झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी, जेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांना व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषदेत एच–



१बी व्हिसा धारकांच्या भविष्याबद्दल विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, मला स्पर्धात्मक लोक आपल्या देशात येणे आवडते. जोपर्यंत एच–१बी व्हिसाचा प्रश्न आहे, मला ते चांगले समजते. मी हा कार्यक्रम वापरला आहे. आम्हाला येथे चांगले काम करू शकतील अशा लोकांची आवश्यकता आहे. आम्हाला आमच्या देशात येण्यासाठी चांगले लोक हवे आहेत आणि आम्हाला हे एच–१बी व्हिसा अधिक फायदेशीर ठरेल असे ते म्हणाले . ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे अमेरिकेत नोकरी करु इच्छीणाऱ्या भारतीयांच्या आशा पल्लवीत झाल्या असल्या तरी जर ट्रम्प यांनी आदेश दिलेले बदल अंमलात आले तर ग्रीन कार्ड किंवा एच१–बी व्हिसावर अमेरिकेत राहणाऱ्या लोकांच्या मुलांचे नागरिकत्व देखील आक्षेपार्ह ठरू शकेल . त्यांना जन्माच्या वेळी आपोआप नागरिकत्व मिळणार नाही.

बहुतेक कायदेतज्ज्ञांचा असा विश्वास आहे की राष्ट्राध्यक्ष ट्रम्प कार्यकारी आदेशाद्वारे जन्मसिद्ध नागरिकत्वाचा अधिकार संपवू शकत नाहीत.अमेरिकेत कायदेशीररित्या विविध व्हिसावर राहणाऱ्या लोकांच्या मुलांनाही जन्मतःच नागरिकत्व मिळते. पण ट्रम्प यांच्या निर्णयाचा त्यांच्या अधिकारांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

२०२४ पर्यंतच्या अमेरिकन जनगणना ब्युरोच्या आकडेवारीनुसार, अमेरिकेत सुमारे ५४ लाख भारतीय राहतात, जे अमेरिकेच्या लोकसंख्येच्या १.४७ टक्के आहे. यापैकी दोन तृतीयांश लोक पहिल्या पिढीतील स्थलांतरित आहेत, म्हणजेच ते त्यांच्या कुटुंबातील अमेरिकेत जाणारे पहिले होते. पण बाकीचे अमेरिकेत जन्मलेले नागरिक आहेत.अलीकडील आकडेवारीनुसार, ७२ टक्के व्हिसा भारतीय नागरिकांना देण्यात आले. यानंतर, चिनी नागरिकांना १२ टक्के व्हिसा देण्यात आले. फिलीपिन्स, कॅनडा आणि दक्षिण कोरियाच्या नागरिकांना प्रत्येकी एक टक्का व्हिसा मिळाला.ट्रम्प यांनी कदाचित एखाद्या योजनेचा भाग म्हणून कार्यकारी आदेश जारी केला असेल पण तिथे राहणाऱ्या भारतीयांवर त्याचा कोणताही परिणाम होईल असे वाटत नाही असेही काही कायदेतज्ज्ञांचे मत आहे

नागरिकत्व मुलाला दिले जाते, पालकांना नाही.

पान २ ▶

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)